नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक २४/०२/२०२२ (गुरूवार)

(दुपार)

---

## नागपूर जिल्हयातुन रेती चोरी/धान चोरी करणारे सराईत गुन्हेगारांची टोळी हद्यपार

**पो.स्टे. अरोली येथील सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) अमोल धनराज पिसे टोळी सदस्य २) आकाश मोरेश्वर हटवार ३) इंद्रपाल शिवप्रसाद सिंह ४) प्रफुल मोरेश्वर चाफले ५) पंकज दिवाळु मालेवार यांना कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये ६ महिन्याकरीता हद्यपार.**

पोलीस स्टेशन पारशिवणी, रामटेक व अरोली जिल्हा नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये आपले गुन्हेगारी प्रवृत्तीने दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) अमोल धनराज पिसे वय २४ वर्ष व त्याचे टोळीतील सदस्य आकाश मोरेश्वर हटवार वय २१ वर्ष दोन्ही रा. चोखाळा ता. रामटेक जिल्हा नागपूर ३) इंद्रपाल शिवप्रसाद सिंह वय २५ वर्ष रा. तुकारामनगर कन्हान ४) प्रफुल मोरेश्वर चाफले वय २५ वर्ष ५) पंकज दिवाळु मालेवार वय २२ वर्ष दोन्ही रा. नंदापुरी ता. रामटेक यांचे वरुध्द नागपूर ग्रामीण पोलीसांनी कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कार्यवाही करुन त्यंना ६ महिन्याकरीता करीता नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामिण हद्दीतुन हद्यपार केले आहे.

सदर आरोपी हे टोळीने एकत्र येवुन पोलीस स्टेशन पारशिवणी, रामटेक व अरोली परीसरातील नदीचे पात्रातुन अवैद्यरीत्या उत्खनन करून रेतीची चोरी करून वाहतुक करीत होते. तसेच स्थानीक शेतकऱ्यांचे शेतात किंवा घरी ठेवलेले धानाचे पोते चोरून नेवुन त्याची विक्री करीत होते. सदरचे आरोपीतांवर पो.स्टे. पारशिवणी, रामटेक व अरोली येथे चोरीचे व शासकीय अधीकारी/कर्मचारी यांचे कामात गैरकायदयाची मंडळी तयार करून अडथळा निर्माण करणे व त्यांना जिवाने मारण्याची धमकी देणे अशा स्वरूपाचे एकूण ११ गुन्हे नोंद असल्याचे निर्देशनास आले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील राहणाऱ्या लोकांचे मनामध्ये प्रचंड दहशत निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झालेला होता. सदर आरोपीतांचे कृत्ये लक्षात घेता त्यांचे गुन्हेगारी कृत्याला आळा बसविण्याकरीता सराईत गुन्हेगारांचे टोळी विरुध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयांतर्गत श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण यांनी दि. २२/०२/२०२२ रोजी त्यांचे विरूध्द नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामीण हद्दीतुन ६ महिन्याकरीता हद्यपारीची कारवाई केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर